## सद्गुरु श्रीअनिरुध्द दयांकरूं कृपांकरूं

*– सतीशसिंह सिंग, दुबई*

---

दुबईसारख्या परदेशात ह्या श्रद्धावानाचे कोणीही ओळखीचे नव्हते. हा श्रद्धावान सद्गुरु अनिरुद्ध बापूंची काहीही माहिती नसताना, दुबईतील उपासना केंद्रात अकस्मित जायला लागतो. त्यानंतर एका नवीन नोकरीच्या ठिकाणी रुजु होताना, आधीची कंपनी सोडल्यावरून निर्माण झालेल्या पेच–ातून हा श्रद्धावान कसा सुटतो ह्याचा रंजक अनुभव आपल्याला वाचायला मिळतो.

---

हरि ॐ. सन् २००० साली मी दुबई उपासना केंद्रात पहिल्यांदा गेलो. मी एक इंजिनियर असून दुबईमध्येच कार्यरत आहे.

मी अगदी पहिल्यांदाच दुबईमधील एका देऊळात गेलो. तिथे काही भक्त एकत्र येऊन सद्गुरु अनिरुद्ध बापूंचे कार्य व त्यांच्या उपासने विषयी चर्चा करत होते. माझीही त्यांच्याशी ओघा ओघाने ओळख झाली व मीही उपासनेला जाण्याची तयारी दर्शवली. पण मी विचारात पडलो की हे सर्व भक्त उपासने विषयी बोलत आहेत खरे, पण आपल्याला तर साधी उपासना म्हणजे काय हेही माहित नाही. परंतु त्यांनी सांगितलेल्या जागेवर जाऊन तर बघू, ह्या उद्देशाने मी तिथे गेलो.

उपासना स्थळी शिरताच ते प्रसन्न वातावरण बघून मी मोहित झालो व पुढे जाऊन पाहिले तर मला दिसले की तिथे सद्गुरु अनिरुद्धांचा एक मोठा फोटो होता व त्याला हार घातलेला होता. मग मला तेथील उपस्थितांकडून सद्गुरु बापूंची माहिती मिळाली. ते म्हणाले, ''हे आमचे सद्गुरु आहेत. आम्ही ह्यांना बापू ह्या नावाने हाक मारतो''. मीही त्या तसबीरीला नमस्कार केला व तेथील उपासनेत सर्वांबरोबर सहभागी झालो. उपासनेला जाण्यापूर्वीचे माझे विचार व त्यानंतरच्या माझ्या विचरात जे परिवर्तन झाले, ते मी आज सर्वांना सांगू इच्छितो. मला खऱ्या सद्गुरुंची प्राप्ती झाली ह्याची मला मनोमन खूण पटलेली होती.

मला सुरुवातीला उपासना केंद्रावर जाण्यापूर्वी असे वाटले होते की ही सर्व मंडळी कुठल्यातरी माणसाबद्दल बोलत असतील, जो ज्योतिष शास्त्र जाणत असेल व हात बघत असेल. ह्याचे कारण की पूर्वी मी ज्योतिषाकडे जा, हात दाखव, अशा अनेक गोष्टी केल्या होत्या. पण बापूंकडे गेल्यावर सद्गुरु म्हणजे काय व खरी भक्ती कशी करावी ह्याची मला प्रचिती आली. माझा आत्मविश्वासही वाढला होता. खऱ्या सद्गुरुंची प्राप्ती झाली ह्याची मला मनोमन खूण पटलेली होती. आज मी सर्वांना मला २००३ साली आलेला बापूंचा अनुभव सादर करणार आहे.

जसजशी माझी उपासना वाढत गेली, तसतसा माझा बापूंवरचा विश्वास दृढ होत गेला व मला पूर्ण खात्री पटली की ही एकमेव सद्गुरुंची शक्ती आहे, जी सदैव आपल्या अवती भोवती असून आपले रक्षण करत आहे व प्रत्येक गोष्टीत मला मार्गदर्शन करत आहे. ते माझे सद्गुरु बापूच होते. मी त्यांना बघू शकत नव्हतो पण ते माझ्या बरोबर सदैव आहेतच ह्याची मला खात्री झाली.

ह्याच दरम्यान मला एका मोठ्या कंपनीत काम करण्याची संधी प्राप्त झाली. दुबईमध्ये काही कायदे असतात. परदेशात गेल्यावर तुमच्या पासपोर्टवर व विझावर एक परमीट लागते, जे दाखवते की तुम्ही कुठल्या हुद्यावर आहात व किती वर्षे तिथे काम करणार आहात. जर तुम्ही तुमची नोकरी मध्येच सोडलीत, तर त्या विझाचे नूतनीकरण पुन्हा होऊ शकत नाही.

दुबईला एक कायदा असाही आहे की जर एका कंपनीतून दुसऱ्या कंपनीत नोकरी बदलायची असेल तर जुन्या कंपनीकडून त्यांची हरकत नसल्याचे प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) घेणे आवश्यक असते, किंवा तुमची जुनी कंपनी नवीन कंपनीच्या संगनमताने तुमची बदली करू शकते. ह्या सर्व कायद्यांची मला फारशी माहिती नव्हती. दुसऱ्या कंपनीत चांगली संधी मिळते आहे, तर ती का सोडा, या विचाराने मी त्या संधीचा फायदा घेतला. ही एक अर्धशासकीय सरकारी कंपनी होती व पगारही पूर्वी पेक्षा ४०%ने जास्त होता. मी ह्या नवीन कंपनीत नोकरी करायचे ठरवले. दुबईला त्या वेळी असाही कायदा होता की जेव्हा तुम्ही एखादी नोकरी सोडता, तेव्हा तुमचा पासपोर्ट त्या कंपनी बरोबरच असणे आवश्यक आहे व विमानतळावर तुम्हाला ती कंपनी तुमचा पासपोर्ट परत देते.

अनुभवाच्या मध्येच मी असे सांगू इच्छितो की ह्या ज्या उपासना माझ्याकडून बापू करवून घेत होते, ते येणाऱ्या संकटांमध्ये सामर्थ्य देण्यासाठी होते असे मला खात्रीने वाटते. माझे बापू प्रत्येक वेळी माझ्या आजूबाजूला एक दिपस्तंभ बनून खंबीरपणे उभे होतेच.

मला अजून एक गोष्ट पुढे नव्यानेच कळली की नवीन नोकरीला लागल्यावर तुमच्यावर त्या देशात ६ महिन्यांची बंदी (बॅन) लागतो. काही कंपनीज् हे मुद्दामून करतात तर काही कंपनीज् त्या बॅनमधून तुमची मुक्तताही करतात. काही चुका करुन, किंवा फसवणूक करून तुम्ही आधीची कंपनी सोडत असाल तर ह्या बंदीची आवश्यक्ता आहे, पण जर तुम्ही इतर कारणास्तव नोकरी सोडत असाल, तर ह्याची आवश्यकता नसते. तेव्हा माझ्या जुन्या कंपनीने मला सांगितले की तुम्ही राजीनामा द्या व तुम्हाला तुमचा पासपोर्ट विमानतळावर मिळेल. त्यानुसार मी विमानतळावर गेलो, तेव्हा कंपनीच्या पी.आर.ओ. ने सांगितले, ''तुमच्यावर ६ महिन्यांची बंदी घालण्यात आली आहे. तेव्हा ६ महिने तुम्ही ह्या देशात येऊ शकणार नाही''. मला तर नवीन नोकरी दुबईलाच मिळाली होती. त्यांचे हे वाक्य ऐकल्यावर माझ्या तोंडून अगदी पहिला शब्द निघाला तो म्हणजे 'बापू'. बापू माझ्या जवळच होते व सगळं ऐकत होते, हा माझा विश्वास होताच.

मीही सकारात्मकच विचार केला की हयातूनही बापू आपल्याला नक्कीच काहीतरी चांगले देतील. मी माझ्या नवीन कंपनीच्या पी.आर.ओ.शी फोनवरून बोललो. मी त्यांना सगळी परिस्थिती समजावून सांगितली. त्यावर त्या म्हणाल्या, ''तुम्ही कुठलाच विचार न करता दुबईलाच थांबा''. त्या पुढे हेही म्हणाल्या, ''तुम्ही मुख्य दरवाजाच्या बाहेर जायचे फक्त त्या जुन्या पी.आर.ओ. पुढे नाटक करा''. त्या पुढे म्हणाल्या, ''इमिग्रेशन मध्ये न जाता मुख्य लॉबीमधील तिसऱ्या दरवाज्यातून थेट बाहेर चालत जा''.

त्यांनी सांगितल्यानुसार मी लॉबी मध्ये गेलो व तिसऱ्या गेटने बाहेर येताच बघितले की त्या नवीन कंपनीची गाडी माझ्या करताच बाहेर उभी होती. मी लगेचच त्या गाडीमध्ये जाऊन बसलो. मला चांगला पगार व चांगली नोकरी मिळत असल्याने मी जुनी नोकरी सोडलेली होती. मी त्या कंपनीमध्ये राहिल्या न राहिल्याने त्या कंपनीला काहीच फरक पडणार नव्हता. मी काही कोणाची फसवणूक केली नव्हती. बापू नेहमीच खऱ्याची साथ देतात. पुढे असे झाले की नवीन कंपनीच्या पी.आर.ओ.ने माझा पासपोर्ट घेतला व कंपनीमध्ये फोन लावून अरेबीक भाषेमध्ये काहीतरी बोलला. त्यानंतर मला म्हणाला, ''काही विचार नका करू. सर्व काही ठीक होईल''. मला असे वाटले की माझे बापूच मला आश्वासन देत होते की सगळं काही ठीक होईल. नाहीतर परक्या देशातील परकी माणसे उगाचच का म्हणून एखाद्याला मदत करतील? माझ्याहीपेक्षा अनेक प्रतिभावान माणसे त्यांना दुबईत मिळाली असती.

ह्यानंतर मला त्या नवीन कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, ''तुम्ही घरी जा'' व नवीन कंपनीचा पी.आर.ओ. पासपोर्ट घेऊन

ऑफिसमध्ये गेला. पुढील सहा महिने मी दुबईतच होतो, पण माझ्याकडे पासपोर्टही नाही व विझाही नव्हता. कोणीही मला ६ महिने काही विचारलेही नाही. मी त्या नवीन कंपनीत मस्त काम करत होतो, दुबईत फिरत होतो, गाडीही चालवत होतो. दुबईत मी अगदी मस्त आयुष्य जगत होतो.

सहा महिन्यांनी मला माझा पासपोर्ट व विझा हातात मिळाला. जुनी कंपनी माझे काहीच वाकडे करू शकली नाही व नवीन कंपनीत मी काम करत होतो. माझ्या बरोबर माझ्या सद्‌गुरु बापूंची कृपा होती, आहे व पुढेही अशीच राहणार आहे. मला बापूंचे असे अनेक अनुभव आले, पण हा अनुभव जो होता, तो आज दुबईमध्ये कोणाला जाऊन सांगितला तर ते म्हणतील, 'हे असे होणे अशक्यच आहे'.

सद्‌गुरु अनिरुद्ध बापूही नीतीमूल्यांशी निगडीत नियमांनाच धरुन चालणारे आहेत. पण मी जर कुठे चुकलेलोच नाही तर बापूही मला नक्कीच मदत करतील हा माझा विश्वास होता. त्याप्रमाणेच ते माझ्यासाठी धावत आले. बापूंना तर मी कधी बघितलेही नव्हते, पण त्यांची उपासना केल्यानेच माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास बसला व त्यांच्या कृपेचा वरदहस्त माझ्यावर होताच.

बापूच माझे पिता, मित्र व सद्‌गुरु आहेत व त्यांनी मला ह्या संकटाची चाहूलही न लागू देता मला त्यातून बाहेर काढले. बापूंनी मला आजपर्यंत भरभरुन सर्व काही दिले आहे. बापूंची स्तुती करण्याकरिता माझ्याकडे आज शब्द नाहीत. पण बापूंनीच प्रत्येक वेळी 'अंबज्ञ श्रीराम' म्हणायलाही शिकवले आहे. मी खरंच खूप खूप अंबज्ञ आहे. बापू, मी आज तुमच्याच छत्रछायेत सुखरुप आहे. तुमची दया, कृपा, करुणा अशी सर्वांवर असू देत, हीच माझी तुमच्या चरणी सदिच्छा.

हरि ॐ श्रीराम अंबज्ञ

नाथसंविध्